आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१७ डिसेंबर २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत उमेदवारी अर्जावर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम, राज्य मंत्रीमंडळाचा निर्णय

- नगरपरिषदा आणि नगरपंचायतीसाठी निवडणुकांच्या मतदान आणि मतमोजणीच्या दिवशी अनुचित घटना टाळण्यासाठी उपाय योजना करण्याचे राज्य निवडणूक आयोगाचे आदेश

- अणुऊर्जेचा शाश्वत वापर आणि प्रगती विधेयक लोकसभेत मंजूर

**आणि**

- सदनिका घोटाळ्यातल्या शिक्षेनंतर माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात अटक वॉरंट, उच्च न्यायालयात शुक्रवारी सुनावणी

**<><><><><>**

जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत उमेदवारी अर्जाबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम ठरवण्यासाठी निवडणूक कायद्यात सुधारणा करायचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. आज मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत, निवडणूक अधिनियम १९६१ मध्ये सुधारणा करणारा अध्यादेश काढायला मान्यता देण्यात आली.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियमातल्या तरतुदीनुसार उमेदवारी अर्ज स्वीकारणाऱ्या किंवा स्वीकारायला नकार देणाऱ्या निवडणूक अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयात याचिका दाखल करता येते. मात्र विविध जिल्हा न्यायालयांमध्ये वेगवेगळ्या कालावधीसाठी अशा अनेक याचिका प्रलंबित राहत असल्यानं निवडणुका कालबद्धरित्या घेणं शक्य होत

नसल्यानं, या तरतुदी वगळण्याबाबतचा प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगानं शासनाला पाठवला आहे. त्यानुसार हा निर्णय घेतल्याचं राज्य शासनाच्या प्रसिद्धिपत्रकात म्हटलं आहे.

गड-किल्ल्यांप्रमाणेच राज्य संरक्षित स्मारक परिसरातली अतिक्रमणं राज्य सरकार रोखणार आहे. त्यासाठी सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णयही आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत झाला.

<><><><><>

नगरपरिषदा आणि नगरपंचायतीसाठी शनिवारी मतदान होत आहे आणि रविवारी मतमोजणी होणार आहे. मतदानाच्या तसंच मोजणीच्या दिवशी अनुचित घटनांना आळा घालण्यासाठी वेळीच उपाय योजना कराव्यात आणि अशा घटना घडल्या तर त्वरित कठोर कारवाई करावी, असे निर्देश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिले आहेत. नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांच्या तयारीसंदर्भात जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, जिल्हा पोलीस अधीक्षक आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची गेले काल आणि आज दूरचित्र संवादाच्या माध्यमातून बैठक झाली त्यावेळी त्यांनी हे निर्देश दिले.

<><><><><>

अणुऊर्जेचा शाश्वत वापर आणि प्रगती विधेयक आज लोकसभेत मंजूर झालं. या क्षेत्रात सुरक्षा, दर्जा आणि आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठीच्या यंत्रणा बळकट करण्याचं काम हे विधेयक करेल, असा विश्वास अणुऊर्जा राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी विधेयकावरच्या चर्चेला उत्तर देताना व्यक्त केला. या क्षेत्रातल्या खासगी कंपन्यांना सरकार जास्त अधिकार आणि स्वातंत्र्य देत असल्याचंही त्यांनी सांगितलं. या कायद्यामुळे २०४७पर्यंत १०० गिगावॅट अणुऊर्जा निर्मितीचं लक्ष्य साध्य होईल, असंही ते म्हणाले.

अणुऊर्जेसारख्या क्षेत्राची दारं खासगी कंपन्यांसाठी उघडण्याचे तोटे अधोरेखित करून काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, द्रमुक इत्यादी पक्षांनी या विधेयकाला विरोध केला. हे विधेयक मंजूर झाल्यानंतर विरोधकांनी सभात्याग केला.

सध्या विकसित भारत- रोजगार आणि आजीविका हमी योजना ग्रामीण विधेयकावर लोकसभेत चर्चा सुरू आहे.

सन २०२४-२५ मधे देशातलं कोळसा उत्पादन १ अब्ज टनापर्यंत गेल्याचं कोळसा मंत्री जी किशन रेड्डी यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात एका पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं.

दोन हजार किलोमीटर रेल्वेमार्गावरील कवच प्रणाली कार्यान्वित करण्यात आल्याचं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत सांगितलं.

अन्नधान्याची साठवण करण्यासाठी विविध राज्यात अडीच हजारापेक्षा जास्त गोदामं सुरू असल्याची माहिती केंद्रीय ग्राहक व्यवहार राज्यमंत्री निमुबेन बांभनिया यांनी लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी सरकार प्रामुख्याने तांदूळ आणि गहू खरेदी करतं असं त्या म्हणाल्या.

आधार कार्डशी संलग्न असणाऱ्या कोणत्याही माहितीचं उल्लंघन झालं नाही असं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री जितीन प्रसाद यांनी आज लोकसभेत सांगितलं.

**<><><><><>**

निरस्तिकरण आणि दुरुस्ती विधेयक २०२५ आज राज्यसभेत चर्चेनंतर मंजूर झालं. लोकसभेनं हे विधेयक कालच मंजूर केलं होतं. एकंदर ७१ कायदे रद्द करण्याची आणि ४ कायद्यांमध्ये सुधारणा करायची तरतूद या विधेयकात आहे.

राज्यसभेत सध्या सबका वीमा सबकी रक्षा या विधेयकावर चर्चा सुरू आहे.

आर्थिक सायबर घोटाळे अहवाल आणि व्यवस्थापन प्रणाली सुरू केल्यापासून आलेल्या २३ लाख तक्रारीची दखल घेऊन ७ हजार कोटी रुपये

इतकी रक्कम वाचवल्याची माहिती गृह राज्यमंत्री बंडी संजय कुमार यांनी राज्यसभेत दिली.

प्रधानमंत्री कौशल विकास योजनेतून गेल्या पाच वर्षांमध्ये ५३ लाखांहून अधिक उमेदवारांना प्रशिक्षण दिल्याचं केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री जयंत चौधरी यांनी आज राज्यसभेत सांगितलं.

**<><><><><>**

विकसित भारत- रोजगार आणि आजीविका हमी योजना ग्रामीण विधेयकावर संसदेत चर्चा सुरू आहे. या विधेयकातल्या तरतुदींविषयी नाशिक जिल्ह्यातल्या एकलहरे ग्रामपंचायतीचे सदस्य सागर जाधव यांनी आकाशवाणीकडे प्रतिक्रिया व्यक्त केली.

होल्ड बाईट जाधव

**<><><><><>**

सदनिका घोटाळा प्रकरणी राज्याचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांच्याविरुद्ध नाशिक जिल्हा आणि सत्र न्यायालयानं आज अटक वॉरंट जारी केलं. कोकाटे रुग्णालयात दाखल असल्यानं अटक पुढे ढकलण्याची विनंती करणारा अर्ज त्यांच्या वकिलांनी केला होता. मात्र न्यायालयानं हा अर्ज फेटाळून लावला, तसंच काल या प्रकरणाच्या अंतिम सुनावणीला गैरहजर राहिल्याबद्दल कोकाटे यांच्यावर ताशेरे ओढले.

नाशिक जिल्हा न्यायालयाच्या निर्णयाला कोकाटे यांनी मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिलं. या प्रकरणाची तातडीनं सुनावणी घ्यावी, अशी मागणी त्यांच्या वकिलांनी न्यायमूर्ती आर. एन. लढ्ढा यांच्या पीठाकडे केली, मात्र न्यायालयानं या प्रकरणाची सुनावणी शुक्रवारी ठेवली आहे.

न्यायालयाच्या निकालाची प्रत अद्याप मिळालेली नाही, त्यामुळं कोकाटे यांची आमदारकी रद्द करण्याच्या संदर्भात निर्णय झालेला नाही, असं विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगितलं.

आजच्या मंत्रीमंडळ बैठकीनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची मुंबईत वर्षा निवासस्थानी भेट घेतल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी दिली. याप्रकरणी कोकाटे यांचा राजीनामा घ्यायचा किंवा नाही हे अजित पवार ठरवतील, असंही मिटकरी यांनी स्पष्ट केलं.
न्यायाधीश पी. एम. बदर यांनी काल माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू विजय कोकाटे या दोघांना सदनिका घोटाळा प्रकरणी दोषी ठरवून दोन वर्षं सक्तमजुरी आणि दहा हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा ठोठावली होती.

**<><><><><>**

राज्यात सध्या ९१सहकारी आणि ९३ खासगी मिळून १८४ साखर कारखान्यांचा ऊस गाळप हंगाम सुरू आहे. यामध्ये ८० लाख मेट्रिक टनाइतके सर्वाधिक ऊस गाळप पूर्ण करून पुणे विभागाने आघाडी घेतली तर ७७ लाख मेट्रिक टन गाळपासह कोल्हापूर विभाग ऊस गाळपात दुसऱ्या स्थानी आहे.

**<><><><><>**

भारतीय राजस्व सेवा ही देशाच्या आर्थिक विकासाला चालना देणाऱ्या सेवांपैकी महत्त्वाची सेवा असून यातील अधिकाऱ्यांनी कर प्रशासनातल्या गुंतागुंती समजून घेण्यासाठी इतर विभागांच्या कार्यप्रणालीचाही अभ्यास करावा असं भारताचे महालेखापरीक्षक आणि नियंत्रक के. संजय मूर्ती यांनी आज सांगितलं. नागपूर इथे राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमीत भारतीय महसूल सेवेतल्या अधिकाऱ्यांच्या नवीन तुकडीला करप्रशासनाची शपथ देताना ते बोलत होते.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या विमानतळांवर उतरणाऱ्या विमानांमधल्या उद्घोषणा या हिंदी आणि इंग्लिश भाषांसोबत मराठीतही करण्यात याव्या अशी मागणी काँग्रेस आमदार नाना पटोले यांनी प्रधानमंत्र्यांकडे केली आहे. यामुळे देशविदेशातल्या प्रवाशांना इथल्या संस्कृती आणि भाषेची ओळख होईल असा दावा त्यांनी केला आहे.

<><><><>

अंमली पदार्थांची तस्करी करणारी आंतरराष्ट्रीय टोळी पुणे पोलिसांनी उघडकीला आणली आहे. पुणे, मुंबई, गोवा आणि गुवाहाटी अशा विविध ठिकाणी कारवाई करून सुमारे पावणेचार कोटी रुपये किमतीचे अंमली पदार्थ जप्त केले असून ५ जणांना अटक केली आहे. खडकी पोलीस ठाण्यात नोंदलेल्या तक्रारीवरुन ही कारवाई केल्याचं आज प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

<><><><>

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये इयत्ता दहावी-बारावीच्या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. या परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची डिजिलॉकरमध्ये निकाल पत्रिका उपलब्ध व्हावी, यासाठी अपार आयडी नोंदणी करणे आवश्यक आहे. सर्व शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांनी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा अपार आयडी उपलब्ध करून त्याची नोंद राज्य मंडळाच्या संकेतस्थळावर करावी, अशा सूचना राज्य मंडळाचे सचिव दीपक माळी यांनी दिल्या आहेत. डिजीलॉकरमुळे विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकांचे कायमस्वरूपी डिजिटल रेकॉर्ड तयार होऊन वेगवेगळ्या शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश तसंच सरकारी शिष्यवृत्ती आणि योजनांमध्ये लाभ मिळणे सुलभ होते.

<><><><>

दुबईत ओशनमॅन वर्ल्ड चँपियनशीप स्पर्धेत ३० ते ३९ वर्षे वयोगटातून रत्नागिरीचे राहुल भोसले यांनी यश मिळवलं आहे. या स्पर्धेत समुद्रात १०

किलोंमीटर अंतर पोहून साडेचार तासांच्या कालावधीत  पार करायचं होतं. ही स्पर्धा पूर्ण करणारे ते रत्नागिरीतले पहिलेच जलतरणपटू आहेत.

**<><><><><>**

गेल्या २४ तासात विदर्भात बऱ्याच ठिकाणी तर कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी किमान तापमानात किंचित घट झाली.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

**//<><><><><>//**